सेवावर्धिनी

# सेवा तरंग

## 2.0

# सेवा वार्ता

अंक ४

२०२३-२४

सेवावर्धिनी

नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम" , राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०

कार्यालय: "चंदन"२६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ सेवा आरोग्य फाउंडेशन, पुणे

२.२ विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली

३. संस्था संचालन – सोशल मिडीयाची ताकद आणि प्रभावी वापर

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – एक मुठ्ठी अनाज अभियान

५. सेवाव्रती

५.१ पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे

५.२ पद्मश्री डॉ. मनोहर कृष्णा डोळे

६. सेवावार्ता – सेवा संस्थांसाठी महत्वाचे

# मनोगत

सेवातरंग २.० या अंतर्गत प्रकाशित होणार्‍या चौथ्या अंकात आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत. गेल्या महिन्यात आपण सेवावर्धिनीच्या वर्धापनदिनी प्रत्यक्ष भेटलो होतो. प्रकल्प अहवाल, आपल्याला आर्थिक मदत करणार्‍या आस्थापनांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्थाबांधणी अंतर्गत सेवासंस्थांच्या व्यवस्थापनात असलेल्या त्रुटी शोधून काढून त्या दूर करण्याच्या संबंधीची उपाययोजना निश्चित करण्यासाठी दिशा दाखवणारे सेवावर्धिनीने तयार केलेले एक तंत्र आपण पाहिले.  त्यानंतर आभासी माध्यमाद्वारे आर्थिक नियोजनाबाबत झालेल्या मार्गदर्शन कार्यक्रमात आपण भाग घेतलात.  या सर्वांचा आपण प्रत्यक्ष संस्थाचालनात उपयोग करून घ्याल याची खात्री वाटते.

आजच्या अंकात आपण आरोग्य क्षेत्रात काम करणार्‍या दोन संस्था व त्यांचे कार्य यांची माहिती करून घेणार आहोत. सेवाभावी वृत्तीने समाजासाठी झोकून देऊन आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या अशाच दोन व्यक्तींचीही आपण या अंकात ओळख करून घेणार आहोत. सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर एक व्यक्ति किती महान कार्य उभे करू शकते हे वाचणे आपल्याला स्फुर्तिदायक ठरेल. समाजाच्या दैनंदीन जीवनातील निरिक्षणांवरून समस्यांची अनुभूती होऊन त्यावर आपण नुसताच विचार न करता प्रत्यक्ष काहीतरी करायला पाहिजे या भावनेतून एका व्यक्तिने सुरू केलेला एक प्रकल्प फक्त गरजवंतांना मदत करत नाही, तर हजारो कुटुंबांना सेवा कार्यात कसा जोडू शकतो याबद्दलही आपण जाणून घेणार आहोत.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या दैनंदीन जीवनात वेगवान बदल घडत आहेत. आपण लोकांशी संवाद कसा साधतो, माहितीचे आदान प्रदान कसे करतो याची माध्यमे गेल्या दोन दशकात खूप बदललेली आहेत. या बदलाची नोंद घेऊन आपण संस्था संचालनासाठी अशा नविन समाज माध्यमांचा (सोशल मिडियाचा) वापर कसा करून घेऊ शकतो याची उद्बोधक माहिती आपण घेणार आहोत. या नविन माध्यमांचा वापर करण्यात आपल्याला आता मागे राहून चालणार नाही. या संबंधीची आभासी चर्चा आपण मे महिन्यात करणार आहोत. नेहमीप्रमाणे आपण लेख वाचून त्यावर आपल्या प्रतिक्रिया तसेच असल्यास काही शंका आम्हाला कळवाव्यात म्हणजे त्याचे निरसन प्रत्यक्ष चर्चेत करता येईल.

हा अंक हाती पडे पर्यंत जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया चालू झाली असेल. आपण सर्वांनी मतदान करून इतरांसही प्रवृत्त करावे व बलशाली भारताच्या उभारणीत आपले अमूल्य योगदान द्यावे ही विनंती करून आज येथे थांबतो.

**– विक्रम पंडित**



## वार्षिक उपक्रम

### निवासी शिबीर

घे भरारीच्या २०० किशोरींचे दोन दिवसीय निवासी शिबीर राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा,कासार आंबोली येथे २५,२६ डिसेंबर ला संपन्न झाले.

### फिल्ड व्हिजीट

वर्गातील मुलींना तुम्हाला काय व्हायचे आहे ? असे विचारल्यावर बऱ्याच मुली सैनिक ,पोलीस व्हायचे आहे असे सांगतात. त्यामुळे करिअर मार्गदर्शनासाठी तज्ञांना आमच्याकडे न बोलावता आम्ही मुलींना फिल्ड व्हिजीट साठी घेऊन जातो. सेंद्रिय शेती,अग्निशामक दल,आर्मी युनिट ,पोलीस प्रशिक्षण केंद्र अशा ठिकाणी घे भरारी प्रकल्पातील किशोरींची फिल्ड व्हिजीट झालेली आहे.

"घे भरारी" हा फक्त एक प्रकल्प नसुन किशोर वयातील मुलींना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देऊन त्यांच्या आकांक्षांना साकार करण्याची संधी प्रदान करण्याचे एक अभियान आहे.

**– प्रदीप कुंटे**

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.१ सेवा आरोग्य फाउंडेशन, पुणे

प्रत्येक व्यक्तीला निरोगी व परिपूर्ण जीवन जगण्याची संधी, योग्य वैद्यकीय सेवा मिळणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून २०१६ मध्ये सेवा आरोग्य फौंडेशनची स्थापना झाली. पुण्यातील वंचित समुदायांसाठी आरोग्यसेवा सुलभता आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी समर्पित सेवा देणे हे संस्थेचे ध्येय आहे. पुण्यातील कोथरूड, कर्वेनगर, वारजे, उत्तमनगर व शिवणे आदि परिसरातील वस्तीमध्ये सेवा आरोग्य मागील ८ वर्षांपासून काम करत आहे. आरोग्यवर्धन, घेभरारी, समृद्धी वर्ग व शिक्षण उपक्रम असे आयाम असून या अंतर्गत आरोग्य, शिक्षण, संस्कार इत्यादी उपक्रम घेतले जातात. यातील प्रत्येक उपक्रमाविषयी थोडक्यात जाणून घेऊ.

आरोग्यवर्धनचा अर्थ आरोग्य सुधारणे असा आहे. सेवा आरोग्य फाऊंडेशनचा हा प्रमुख उपक्रम आहे. मागील ८ वर्षांत २६ वस्त्यांमधून २८ सामाजिक अल्पमूल्य दवाखाने सुरू असून यामध्ये ॲलोपॅथिक २०, आयुर्वेदिक १, फिजिओथेरपी ६ आणि नेत्र तपासणी २ असे दवाखाने सुरू केले आहेत. यातील लाभार्थींची संख्या ११,००० आहे.

सामाजिक दवाखाना: सेवा वस्तीमध्ये सामाजिक दवाखाने सुरु आहेत. त्याच भागामध्ये मंदिर या छोट्या खोलीमध्ये दवाखाना चालवला जातो. दोन प्रकल्प समन्वयक, सहा वस्ती समन्वयक व तीस आरोग्य मैत्रिणी अशा साऱ्याजणी मिळून सेवाकार्याची धुरा सांभाळतात. वस्तीमध्ये राहणारी महिला दवाखान्यात आरोग्यमैत्रीण म्हणून काम करते. दवाखान्यामध्ये सर्दी, खोकला, ताप यासोबतच ॲनेमिया, हाडांमधील ठिसूळपणा, त्वचारोग, सांधेदुखी, डोळ्यांचे विकार अशा विविध आजारांवर उपचार केले जातात. ज्यांना सांधेदुखी, पक्षाघात आहे अशा रुग्णांना फिजिओथेरपी ओपीडीला तर डोळ्यांचे आजार असणाऱ्या पेशंटची Eye OPD ला जोडणी करून दिली जाते. त्वचाविकार सारख्या काही आजारांवर होमिओपॅथि उपचार केले जातात.  मागील ४ वर्षांपासून नंदादीप बालक मंदिर येथे आयुर्वेद OPD चालू आहे. संधीवात, आमवात, मूळव्याध, जीर्ण- अम्लपित्त, त्वचा विकार इ. व्याधिंपासून स्त्रियांचे विकार, वंध्यत्व, उच्च रक्तदाब , मधुमेह, फिट्स येणे, मज्जातंतूचे विकार, कॅन्सर अशा आजारांकरिता येथे पूर्ण आयुर्वेदीय उपचार नाममात्र दरात केले जातात. राष्ट्रवंदना समुहातील युवा वैद्य या विभागाचे काम सातत्याने पाहत आहे. प्रति सप्ताह १०० रुग्ण येथे चिकित्सा करता येतात. तर आता पर्यंत हजारो रुग्णांनी या आयुर्वेद उपचारांचा लाभ घेतला आहे.

### वार्षिक शिबीर:

वस्तीमधील लोकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी वार्षिक शिबिरांचे आयोजन करण्यात येते. अशी ७६ आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून वस्तीतील लोकांना आरोग्यविषयक उपचार व मार्गदर्शन केले आहे.

### ॲनिमिया निर्मुलन १०० दिवस उपक्रम:

ज्यांचे रक्त कमी आहे त्यांची शिबिरामध्ये नोंदणी केली जाते. त्यांना सामाजिक दवाखान्यात तपासून पुढील ४६ दिवसासाठी रक्तवर्धक, विटामीन सी औषध दिले जाते. त्यांना आहाराचे व जीवनशैली बदल याविषयी मार्गदर्शन केले जाते. लोखंडी कढईत स्वयंपाक करण्याचे फायदे सांगितले जातात.

## फिजिओथेरपी दवाखाना:

वस्तीमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, मानदुखी, लहान वयात पॅरॅलेसेसचे प्रमाण जास्त आढळून आले. आतापर्यंत बरे झालेली रुग्ण संख्या १३०० आहे. तर पॅरलेसिस झालेले पेशंट काही बरे झाले आहेत तर काही पेशंट घरती उपचार चालू आहेत त्यांच्यामध्ये ६०% फरक दिसून येत आहे.

नेत्र दवाखाना: आठवड्यातून दोन दिवस नेत्र दवाखाने सुरु आहेत. पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी संजीवनी हॉस्पिटलमधील रेणुका नेत्रालयाची मदत घेतली जाते. यावर्षी १७ नेत्र तपासणी शिबिर घेऊन यात सुमारे ४००० लोकांची तपासणी करून डोळ्याच्या अनेक विकारांचे रुग्ण बरे केले आहेत. त्यामध्ये मोतीबिंदू, नासुर, रांजणवाडी, लांबचा चष्मा, जवळचा चष्मा, डोळ्यांचे अनेक विकार समाविष्ट आहेत.

## समृद्धी वर्ग

संस्कारांचा उपयोग करून  आपल्या रोजच्या व्यावहारिक जीवनात आपले स्वतःचे जीवन समृद्ध कसे करायचे याचे सहशिक्षण देणारा,विविध कलागुणांना वाव देणारा,स्वतःच्या कुटुंब ,समाज ,देश यांच्या प्रगतीचे स्वप्न पहायला शिकवणारा पुढे जाताना आपल्यासह इतरांनाही घेतले पाहिजे ही जाणीव करून देणारा विचार विकसित करण्याच्या उद्देशाने वस्तीतील मुलांसाठी हा प्रकल्प सुरु केला आहे.

सध्या कोथरुड ,कर्वेनगर ,उत्तमनगर ,परमहंस नगरातील एकूण २० वस्त्यांमध्ये ३ ते १४ वयोगटातील मुलांसाठी हे वर्ग चालू आहेत.प्रत्येक वर्गात साधारण २० ते २५ मुलांची उपस्थिती असते. एकूण ६४० मुलांची संख्या आहे.

पर्यावरण संवर्धनातील आपली जबाबदारी काय हे लहान वयातच रुजल पाहिजे. यासाठी पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणारा एक अभिनव उपक्रम घेतला ई-कचरा संकलन.

## घे भरारी किशोर विकास प्रकल्प –

## एकुण वर्ग १७, साप्ताहिक उपस्थिती ४००

२०१८ मध्ये सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेचे काम असलेल्या वस्त्यांमधील १२ ते १८ वयोगटातील किशोरींच्या प्रश्नांना योग्य उत्तरे देऊन योग्य मार्गदर्शन करणे,योग्य वेळी योग्य निर्णय घेणे ,व्यक्त होण्याची जागा  उपलब्ध करून् देणे आणि त्यांच्या पंखात बळ भरून त्यांना उंच भरारी घेण्यासाठी सक्षम करणे हे ध्येय समोर ठेऊन  "घे भरारी" किशोर विकास प्रकल्पाची सुरुवात केली. सध्या एकुण १७ वस्त्यामधे १७ साप्ताहिक वर्ग चालतात, त्यामधे ४०० किशोरी सहभागी आहेत.

## साप्ताहिक वर्ग उपक्रम

संयम सत्रातर्गत किशोर वयातील विविध समस्यांवर प्रशिक्षित  समुपदेशकांकरवी वेगवेगळ्या विषयांवर सत्रे घेण्यात येतात.

## समुपदेशन

गेल्यावर्षी पासून "घे भरारी" वर्गातील किशोरींना वैयक्तिक समुपदेश करत आहोत. वर्गातील काही मुलींना प्रत्यक्ष समुपदेशनाची आवश्यकता आहे असे वाटल्यास संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष समुपदेशन केल्या जाते.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.२ विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली

"वैद्यकीय सेवेतून सामाजिक परिवर्तन" हे उद्दिष्ट समोर ठेवून दि. १२ जानेवारी २००१ रोजी 'विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान'ची स्थापना झाली. ज्या परिसरात कोणत्याही प्रकारची आरोग्यसेवा पोहोचलेली नाही, अल्प उत्पन्न गटातील व दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती व मुले वैद्यकीय सेवेपासून वंचित आहेत, ज्यांना वैद्यकीय उपचारासाठी कित्येक मैल चालत जावे लागते, प्रामुख्याने अशा समाज घटकांसाठी विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानची स्थापना डॉक्टर राम लाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. निस्पृह, निरपेक्ष, निस्वार्थी वृत्तीने सेवा ही विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानची ओळख. ग्रामीण व गरीब लोकांसाठी संस्थेमार्फत खालील सेवा प्रकल्प चालवले जातात.

१. विवेकानंद रुग्णालय
२. संजीवन लिंक वर्कर स्कीम
३. लक्ष्मीप्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूट
४. विवेकानंद कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था
५. विद्यार्थी पालकत्व योजना
६. विवेकानंद मोबाईल हेल्थ युनिट्स
७. अन्नपूर्णा योजना
८. विवेकानंद पुस्तक प्रदर्शनी
९. स्वस्थ ग्राम
१०. महिला बचत गट
११. आरोग्य मित्र
१२. होम नर्सिंग केअर
१३. स्वल्पविराम योजना
१४. विवेकानंद रुग्ण साहित्य केंद्र
१५. संवाद हेल्पलाइन
१६. ज्येष्ठांसाठी निरामय योजना
१७. स्वच्छ पेय जल योजना
१८. ॲनेमिया इरॅडिकेशन प्रकल्प
१९. सहारा प्रकल्प
२०. सहेली प्रकल्प
२१. सेवासरिता
२२. स्नेहसदन प्रकल्प (प्रस्तावित)

### विवेकानंद हॉस्पिटल

संस्थेचे हे हॉस्पिटल १०० बेडस् चे असून सर्व रुग्णांची मनोभावे सेवा करणारे तज्ज्ञ व कुशल अनुभवी डॉक्टर्स, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ  आणि सुसंस्कारित पॅरामेडिकल स्टाफ हे या हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे. विवेकानंद हॉस्पिटलमध्ये बामणोली, कुपवाड आणि आजूबाजूच्या २०/२५ खेडेगावांमधून, वाड्या व वस्त्यांमधून, तसेच सोलापूर, सातारा, कोल्हापूर, कर्नाटकातील बेळगाव, विजयपूर अशा जिल्ह्यांमधूनही विविध आजारांनी ग्रस्त रुग्ण येतात.  विवेकानंद हॉस्पिटल मध्ये आज पर्यंत ६,५०,००० पेक्षा जास्त पेशंटनी उपचार घेतले असून ५००० प्रसूती तसेच ९००० पेक्षा जास्त शस्त्रक्रिया दहा ते बारा वर्षामध्ये झाल्या आहेत.

हॉस्पिटलमध्ये वेगवेगळे स्पेशालिटी विभाग चालवले जातात. यामध्ये मेडिसिन, शस्त्रक्रिया, प्रसुती आणि स्त्रीरोग, बालरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा, दंतरोग, हृदयरोग, अस्थिरोग, कॅन्सर, मधुमेह, मेंदूरोग, मानसिक आजार, मूत्ररोग, निसर्गोपचार, आयुर्वेद, पंचकर्म इत्यादी विभाग आहेत. तसेच रुग्णालयामध्ये ३ मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, २० बेडचा अतिदक्षता विभाग, नवजात शिशू अतिदक्षता विभाग, एक्सरे, सोनोग्राफी, पॅथॉलॉजी, रक्तपेढी, डायलिसीस व अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे; जसे की, सी आर्म, लॅप्रोस्कोप, न्युरोसर्जरी मायक्रोस्कोप, ऑप्थलमिक सर्जरी मायक्रोस्कोप, व्हेंटिलेटर्स, सी. पॅप, बायपॅप, ए स्कॅन, बी स्कॅन, ग्रीन लेझर इ. उपलब्ध आहेत. तसेच हृदयावरील शस्त्रक्रिया करण्याची अत्याधुनिक सामग्री ही लवकरच बसवली जाणार आहे.

या रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना, कामगार विमा योजना, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना तसेच कर्नाटकची सुवर्ण आरोग्य सुरक्षा ट्रस्ट योजना या सर्व योजनांमार्फत मोफत उपचार केले जातात. तसेच अनेक विमा कंपन्यांच्या बरोबर करार झालेला असून त्या विमा कंपन्यांच्या मार्फत असणाऱ्या योजनांचा लाभ ही रुग्णांना दिला जातो.

कोविड काळामध्ये विवेकानंद हॉस्पिटल हे डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल म्हणून शासनाने जाहीर केले. कोविडच्या दोन्ही लाटेमध्ये एकूण १६०० पेशंट रुग्णालयामध्ये दाखल झाले आणि यशस्वीरित्या उपचार पूर्ण करून डिस्चार्ज केले गेले. त्याचबरोबर १६००० पेक्षा जास्त पेशंटनी बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतले. यातील बहुतांशी पेशंटवर शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले योजनेखाली मोफत उपचार केले गेले आणि त्यामुळे पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी विवेकानंद रुग्णालयाचा विशेष सत्कार केला आहे.

विवेकानंद हॉस्पिटलमध्ये कोव्हीड लसीकरण केंद्रही उपलब्ध होते. १०,००० पेक्षा जास्त लोकांचे लसीकरण रुग्णालयामार्फत मोफत करण्यात आले. सध्या रुग्णालयाचा १०६ कर्मचारी वृंद असून ३६ स्पेशालिस्ट डॉक्टर्स उपलब्ध आहेत. रुग्णालयाचा व्याप दिवसेंदिवस वाढतच असून, रुग्णांवर कमीतकमी खर्चामध्ये उपचार केले जातात.

### संजीवन लिंक वर्कर स्कीम:

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई व विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान संचलित संजीवन लिंक वर्कर स्कीम एप्रिल २०१७ पासून सांगली जिल्ह्यातील शंभर गावात सुरु असून सदर प्रकल्पात २४ कर्मचारी काम करीत आहेत. या प्रकल्पांतर्गत एच. आय. व्ही बाबत जनजागृती केली जाते. गावातील तरुण मंडळी, महिला मंडळी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांना एचआयव्ही व एड्स विषयी प्रबोधन व प्रशिक्षण दिले जाते शिवाय विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना एचआयव्ही, एड्स विषयी प्रबोधन केले जाते. गावात आरोग्य शिबिरे घेऊन ट्रक ड्रायव्हर्स, सेक्स वर्कर्स, विस्थापित कामगार वर्ग तसेच तृतीयपंथी यांची एचआयव्हीची तपासणी करणे, मोफत निरोध वितरण (कंडोम) केंद्र स्थापन करणे, टोल फ्री नंबर १०९७ चा प्रचार करणे जेणेकरून संपर्क करून एचआयव्ही, एड्स विषयी माहिती घेण्यास प्रवृत्त केले जाते. तसेच एचआयव्ही पॉझिटीव्ह असणाऱ्या व्यक्तींचे एआरटी औषधोपचारासाठी सातत्य राखणे, गुप्तरोगासाठी संदर्भित सेवा देणे व औषधोपचार संबंधी माहिती देणे इत्यादी कार्य या प्रकल्पांतर्गत केले जाते. सर्व गावात संजीवन लिंक वर्कर स्थानिक समितीची स्थापना केली आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील २६ लाख लोकांपर्यंत संपर्क केला आहे. आजपर्यंत ७६ हजार जणांची मोफत रक्त तपासणी केली आहे. त्यामधून २२८ नवीन एच. आय. व्ही. बाधित रुग्णांची नोंद झाली.






फिरता दवाखाना उपक्रमातून संस्था गेल्या दहा वर्षांपासून सांगली जिल्ह्यातील श्यामनगर, सावळी, तानंग, कानडवाडी, वाघमोडे नगर, रसूलवाडी, कांचनपूर, हरिपूर, धुळगाव, सांबरवाडी, मानमोडी, डवली, म्हैसाळ, सांगलीवाडी, दुर्गानगर, कापसे प्लॉट, दत्तनगर, बजरंगनगर, ज्ञानगिरी वसाहत, कवलापूर, बुधगांव, पाटगाव, इंदिरानगर (बुधगाव), सिध्देवाडी, सिध्दार्थ परिसर, अंबाजी माळी वस्ती, स्वामी मळा, अष्टविनायकनगर, इंदिरानगर (सांगली) इत्यादी ठिकाणी आरोग्यसेवा पुरवित असून महिला, ज्येष्ठ नागरिक, गरीब व गरजू लोकांना या सेवेचा लाभ होत आहे. या गाडीत प्रथमोपचार, औषधे, इंजेक्शन, ड्रेसिंग किट, सलाईन इत्यादी उपचार रुग्णांना मोफत मिळू लागले, त्यामुळे अल्पावधीतच हा फिरता दवाखाना या गावांची गरज बनला आहे. गावातील लोकांचा एकूण आरोग्य स्तर सुधारण्यासाठी महिन्यातून एकदा प्रत्येक गावी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.

शिबिरांमध्ये लोकांच्या विविध रक्त तपासण्या, डोळे, हाडांचे आजार, स्त्रियांचे आजार इत्यादींचे निदान व उपचार केले जातात. वेगवेगळ्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या भेटी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले जाते. गावातीलच काही समाजसेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य व मंडळी या उपक्रमात आपला हातभार लावत असतात. सध्याच्या फिरत्या दवाखान्याद्वारे दहा वर्षामध्ये २८० पेक्षा जास्त आरोग्य शिबिरांचे आयोजन झाले आहे. फिरता दवाखाना प्रकल्पामुळे ३,००,००० पेक्षा जास्त रुग्णांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. ३० गावे आणि वस्त्यांमध्ये विवेकानंद प्रतिष्ठानचा फिरता दवाखाना जातो. रुग्णांची तपासणी व औषधोपचार निशुल्क केला जातो. हजारो रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. फिरता दवाखाना उपक्रम राबवताना औषधांचा खर्च कर्मचाऱ्यांचे मानधन, इंधन इत्यादी खर्चांचा संस्थेवर भार पडतो. या प्रकल्पासाठी प्रत्यक्ष होणारा खर्च रुपये ६०००० ते ६५,००० इतका आहे तरीसुद्धा विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान तसेच समाजातील दानशूर व्यक्ती, कंपन्यांचे सीएसआर फंड, संस्थेचे शुभचिंतक व कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नामुळे हा आरोग्य रथ....

"सेवा हे यज्ञकुंड" या उक्तीप्रमाणे अविरत कार्यरत आहे. असे दोन मोबाईल हेल्थ युनिट्स कार्यरत आहेत.

**– अनिल मोरे**

## लक्ष्मी प्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूट

वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि पॅरामेडिकल स्टाफची वाढती गरज लक्षात घेऊन संस्थेने २०११ साली लक्ष्मीप्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूटची स्थापना केली. यामध्ये शासनमान्य ए एन एम हा नर्सिंग कोर्स सुरू केला आहे. या इन्स्टिट्यूटमध्ये सुसज्ज फंडामेंटल लॅब, सी.एच.एन. लॅब, ॲनाटॉमी लॅब व लायब्ररी आहे. लक्ष्मी प्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूटचे वामणोली येथे विद्यार्थीनींसाठी वसतिगृह व मेस आहे. आजपर्यंत आठ ते नऊ जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांनी हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या विद्यार्थीनींना नर्सिंग कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून विवेकानंद हॉस्पिटल येथे त्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाते. या सर्व नर्सेस देशभरात विविध शासकीय व खाजगी हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेचे कुशल काम करत आहेत व त्यातून पूर्णपणे आर्थिक स्वावलंबी झाल्या आहेत. भविष्यामध्ये जी.एन.एम. व बी.एससी. (नर्सिंग) हे कोर्सेस चालू करण्याचे प्रयोजन आहे. संस्थेने कोर्सेससाठी जवळच १.६ एकर जागा खरेदी केली आहे.

## विवेकानंद कौशल्य प्रशिक्षण संस्था

संस्थेमार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पांतर्गत शासनमान्य कोर्सेस चालवले जातात. त्यामध्ये ओ. टी. टेक्निशियन, आय.सी.यु. टेक्निशियन तसेच सर्टिफिकेट कोर्स इन नर्सिंग केअर चालवले जातात. अनेक विद्यार्थी हे कोर्सेस करून स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत. आजपर्यंत १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे. या कोर्सेस अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी विवेकानंद हॉस्पिटल येथे सुविधा उपलब्ध आहे.

### विद्यार्थी पालकत्व योजना

ज्या मुला मुलींना वडील किंवा आई वडील दोन्ही नाहीत अशा गरीब घरातील मुलांचे पालकत्व संस्थेमार्फत स्वीकारले जाते. या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी स्टेशनरी युनिफॉर्म तसेच इतर लागणारा खर्च संस्थेमार्फत केला जातो. तसेच करिअर मार्गदर्शन, सहल, दिवाळीनिमित्त ड्रेस व खाऊ वाटप केले जाते. चौथीपासून ते ग्रॅज्युएट पर्यंतच्या वयोगट असणारे विद्यार्थी त्यांचे पालकत्व संस्थेतर्फे स्वीकारले जाते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीची चौकशी वरचे वर केली जाते. तसेच त्यांना मानसिक आधार दिला जातो. अनेक चांगल्या आस्थापनांमध्ये या योजनेतील लाभार्थी नोकरीत असून आमच्या संस्थेचे नाव उज्ज्वल करत आहेत. आजपर्यंत ३५० पेक्षा जास्त अनाथ विद्यार्थी विद्यार्थिनी या योजनेच्या लाभातून लाभान्वित झाले आहेत. अनेक विद्यार्थी चांगल्या नोकऱ्या मिळवून स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत.

### अन्नपूर्णा योजना

या योजनेअंतर्गत विवेकानंद हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोफत भोजन दिले जाते. रोज सरासरी ७० ते १०० रुग्णांना व नातेवाईकांना याचा लाभ मिळतो. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांची भोजनासाठीचा डबा आणून देण्यासाठीची परवड टाळली जाते. आजपर्यंत हजारो रुग्णांची रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

### विवेकानंद मोबाईल हेल्थ युनिट्स

दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानमार्फत चालवला जाणाऱ्या फिरता दवाखाना या प्रकल्पाची सुरुवात झाली. हा प्रकल्प सुरू करण्यामागे संस्थेचा उद्देश ज्या खेड्यात, वाड्या-वस्त्यांवर आजही प्राथमिक आरोग्य सेवांची कमतरता आहे तेथे या फिरत्या दवाखान्यामार्फत मोफत आरोग्य सेवा पुरवणे हा आहे. या उपक्रमाद्वारे वृद्ध, अपंग, गरोदर स्त्रिया तसेच अंथरुणाला खिळून असणाऱ्या रुग्णांना आरोग्यसेवा पुरवल्या जातात.

## संस्थेला मिळालेले पुरस्कार

- युनिसेफ पुरस्कार २००७-०८
- आदर्श संस्था पुरस्कार ग्रा.पं. बामणोली २००९-१०
- बेस्ट व्हॉलेंटरी ऑर्गनायझेशन पुरस्कार
- मानव संसाधन व विकास मंत्रालय नवी दिल्ली २०१०-११
- रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी पुरस्कार २०११-१२
- लुल्ला चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडून प्राप्त पुरस्कार २०१२-१३
- समर्पण पुरस्कार बँक ऑफ बडोदा २०१६
- डी.ए.पी.सी.यु. (एम्सॅक्स) पुरस्कार २०१६
- बेस्ट सेवा पुरस्कार फॉर कोविड महाराष्ट्र सरकार २०२१
- कै.बापूराव गोरे पुरस्कार २०२१
- इदं न मम पुरस्कार साप्ताहिक विजयंत
- क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके पुरस्कार सांगली (जिल्हा) नगरवाचनालय सांगली २०२२

5. सोशल मिडियाद्वारे संस्था आपल्या हाती घेतलेल्या प्रकल्पांची अद्ययावत माहिती, यशोगाथा, अडचणी याबद्दल माहिती तसेच शंकांचेही निरसन करू शकतात.
6. सोशल मिडियामध्ये एखाद्या येणार्या उपक्रमांची माहिती देऊन संस्था त्यातील सहभागींची उपस्थिती आणि परिणामकारकता वाढवू शकतात.
7. सोशल मिडिया हे संवादाचे माध्यम आहे. त्यायोगे सेवासंस्था वेगवेगळ्या सूचना, नवनवीन कल्पना मागवू शकतात. तसेच मतदान घेऊन, चर्चा घडवून आपला उपक्रम सर्वसमावेशक करू शकतात.
8. याशिवाय सेवासंस्था आपल्या विषयांबद्दल जागृती तसेच वेगवेगळ्या विकास कामांबद्दल योग्य माहिती प्रसारीत करून समाजात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करू शकतात.

### तात्पर्य:

'आतापर्यंत नमूद केलेले मुद्दे व घ्यावयाची काळजी विचारात घेऊन" सोशल मिडीया आपल्या सारख्या संस्थांना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देऊन आपले कार्य सिद्धिस नेण्यासाठी मदत करू शकते. आपण सर्वांनी आता लवकरात लवकर योजनापूर्वक सोशल मिडियाचा वापर करून त्याचा आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी जास्तीत जास्त सुयोग्य उपयोग करून घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

**– डॉ. रविंद्र उतगीकर**

**उपाध्यक्ष, कार्पोरेट स्ट्रॅटेजी, प्राज इंडस्ट्रीज पुणे.**

# ३.० संस्था संचालन
# – सोशल मिडीयाची ताकद आणि प्रभावी वापर.

### A. सोशल मिडिया (समाज माध्यमे) म्हणजे काय ?

आजच्या युगात सोशल मिडिया ही अशी एक शक्तिशाली व्यवस्था निर्माण झाली आहे की ज्यायोगे आपण आपले विचार, भावना संपूर्ण जगापर्यंत क्षणार्धात पोचवू शकतो व ज्यायोगे आपण आपल्या संस्थेच्या कार्यांशी संबंधीत असलेल्या सर्वांशी प्रभावीपणे संवाद स्थापून आपल्याला अपेक्षित असलेला सकारात्मक बदल घडवू शकतो. फेसबूक, ट्विटर, इन्स्टाग्राम, लिंकडइन, यु ट्यूब व व्हॉट्सअप सारखी अनेक माध्यमे आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. ज्यांचा आपल्या आचार, विचार आणि एकंदर जीवनावरच प्रचंड प्रभाव पडतो. या माध्यमांद्वारे आपण व्यक्त होत असतो आणि माहिती व ज्ञानाची देवाण घेवाण करत असतो.

### B. सोशल मिडियाचे वाढते महत्व

संपर्क: समाज माध्यमातून आपण आपल्या जगभरातल्या परिवाराशी, मित्रमंडळींशी आणि आपल्या संबंधीत असलेल्या सर्वांशी संपर्क साधून आपल्या भावना, अनुभव, विचार, संकल्प व इतर अनेक गोष्टींची देवाणघेवाण करत असतो. या माध्यमांवर आपण चित्रे, चलचित्रे, विविध कला याद्वारे आपला विचार, आपले संशोधन वा आपले यश जगभर पोहोचवू शकतो.

या आभासी माध्यमांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे; प्रत्येकासाठी समान संधी; प्रत्येक व्यक्ति, गरीब असो वा श्रीमंत, ग्रामिण असो वा शहरी, कुठल्याही मर्यादेशिवाय सामाजिक भेदभावापलिकडे जाऊन आपले विचार अतिशय कमी खर्चात जगभर पोचवू शकतात. वेगवेगळ्या विचारांना बांधील असलेल्या पारंपारीक माध्यमात ते शक्य होत नाही. नवमाध्यमांची ही ताकत आपण ओळखली पाहिजे व तिचा खुबीने उपयोग करून घेण्यास शिकले पाहिजे.

### C. सोशल मिडियाचा संस्थेसाठी वापर

आज संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी, आपल्या समाजातील विविध घटकांना संस्थेच्या कार्यात सामावून घेण्यासाठी सोशल मिडियाचा वापर आवश्यक आणि अनिवार्य झाला आहे. आपण विविध प्रकारे नियोजन करून उपलब्ध असलेल्या संधी/ शक्यतांचा सोशल मिडियाद्वारे पुरेपूर फायदा करून घेऊ शकतो. उदा;

1. माहिती संकलन व पृथःकरण: यासाठी उपलब्ध असलेल्या विविध तंत्रांद्वारे आपण आपल्या पुढे असलेल्या विविध प्रश्नांची, परिसराची, तसेच समाजाची विचार आणि वागणूक विषयक माहिती संकलीत करून व त्याचा सखोल अभ्यास करून सर्वोत्कृष्ट परिणामांसंबंधीची उपाय योजना निश्चित करू शकतो.

2. माहितीची गुणवत्ता:

समाज माध्यमांचा उपयोग करताना योग्य परिणाम होण्यासाठी आपण प्रसारीत करीत असलेले लिखाण उच्च दर्जाचे व आकर्षित करणारे असणे अत्यंत आवश्यक आहे. माहितीपूर्ण लेख, चलचित्रे किंवा इतर काही आपल्या श्रोत्यांच्या आकांक्षा समोर ठेऊनच तयार केले पाहिजेत.

3. भावनिक गुंतवणूक : या संवादांद्वारे आपण आपल्या अपेक्षित समुहांवर आपल्या विचारांचा प्रभाव टाकून त्यांच्याबरोबर भावनिक जवळीक निर्माण करू शकतो. ज्याद्वारे ते समुह आपल्या कार्यात समाविष्ट होऊन अपेक्षित परिणाम साध्य करू शकतात. पण यासाठी आपली विश्वासार्हता प्रथम प्रस्थापित करणे महत्वाचे आहे.

### D. सोशल मिडिया वरील आपली प्रतिमा :

१. प्रतिमा: सोशल मिडियावर आपली प्रतिमा निर्माण करण्यासाठी योजनापूर्वक तयारी असणे, सातत्य असलेली आणि कुतुहल जागृत करणारी माहिती देणे जरुरीचे आहे. त्यासाठी खालील गोष्टींचा विचार होणे महत्वाचे आहे. सोशल मिडियावरील गर्दीत आपली विशेष प्रतिमा निर्माण करणे गरजेचे आहे. यामधे आपले कार्यक्षेत्र, आपली मुल्ये यात आपल्या अपेक्षित समुहांच्या आकांक्षा प्रतिबिंबीत होणे महत्वाचे आहे. आपण सतत वेळोवेळी प्रयत्न करुन आपल्याशी संबंधीत समुहांमधे आपली प्रतिमा उत्कट होण्यासाठी प्रयत्न करणे हे आवश्यक आहे.

२. संदेश: आपण आपल्याबद्दल देत असलेल्या संदेशामधे सातत्य असणे जरुरीचे आहे. वेगवेगळ्या माध्यमांद्वारे जाणारी आपल्या बद्दलची माहिती, आपला संदेश यामधे सुसूत्रता असणे व त्याचा आपल्या मुल्यांशी तसेच उद्दीष्टांशी योग्य मेळ असणे आवश्यक आहे. याद्वारे सेवा संस्था आपली प्रतिमा बळकट करुन आपल्या बद्दल विश्वास निर्माण करु शकतात.

३. दृष्य माहिती:  फोटो किंवा व्हिडिओ याबाबत आपल्याला खूप मदत करु शकतात. अनेक सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर यासाठी खूप सोयी उपलब्ध असतात. ज्याचा वापर आपण दर्शकाला आकर्षित करुन आपली एक लक्षात रहाण्यासारखी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करु शकतो.

४. थेट प्रक्षेपण: कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण सोशल मिडियावर आता खूप लोकप्रिय होत आहे. याद्वारे आपल्या कार्यक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन आपण अपेक्षित समुहांना विश्वासार्ह माहिती वेळच्या वेळी पारदर्शक पद्धतीने पोचवू शकतो ज्यायोगे आपली योग्य व विश्वासार्ह प्रतिमा निर्माण होऊ शकते.

### E. सोशल मिडियाचे भवितव्य :

आपण इतरांशी कशा प्रकारे संपर्क साधू शकतो याबाबत गेल्या पंचवीस वर्षात झालेले अचंबीत करणारे बदल आपण प्रत्यक्ष पाहिलेले आहेत.  यापुढे आभासी प्रतिमा, विदा नियोजन तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवनविन तंत्रज्ञानामुळे सोशल मिडियाची प्रगती विलक्षण वेगाने होणे अपेक्षित आहे. तसेच आपल्या दैनंदीन जीवनातही तंत्रज्ञान वेगाने प्रवेश करत आहेत. मोबाईल सारख्या साधनांचा आपण अगदी नेहमीच्या जीवनात आपण पहातोच. तसेच सोशल मिडियाचे होणार आहे.  या अमोघ शस्त्राचा वापर आपण आतापासूनच करायला शिकले पाहिजे.

### सेवासंस्थांसाठी सोशल मिडियाचे महत्व

आतापर्यंत आपण सोशल मिडियाच्या वापरामुळे होऊ शकणारे फायदे पाहिले आहेत. यामधे आपल्या कार्यक्षेत्राचा परिघ वाढवणे, नविन समुहांशी संबंध प्रस्थापित करणे, नविन माहितीचे आदान प्रदान करणे, आपल्या संस्थेसाठी मदत मिळवणे ही उद्दीष्टे साध्य होऊ शकतात.

1. सोशल मिडियाद्वारे आपल्या कार्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळवून देऊ शकतो.
2. सोशल मीडियाद्वारे आपण समविचारी मंडळी, कार्यकर्ते, इतर सेवाभावी संस्था, देणगीदार व आपल्या कार्यांचा फायदा होणार्‍या व्यक्ति या सर्वांना अगदी प्रकल्पाची कल्पना, आखणी आणि नियोजन यापासून ते प्रकल्पाच्या यशस्वी सांगतेपर्यंत आपल्या कार्यात सहभागी करुन सर्वांशी आपुलकीचे नाते जोडू शकतो.
3. सोशल मिडिया द्वारे आपण इतर संस्था, वेगवेगळ्या विषयातील तज्ञ मंडळी आणि विकास कामातील संस्था यांच्याशी संपर्क साधून अद्ययावत माहितीचे आदान प्रदान करुन आपल्या कार्याची व्याप्ती तसेच परिणामकारकता अनेक पटीने वाढवू शकतो.
4. सेवासंस्था आपली आर्थिक मदतीची अपेक्षा आपले दाते तसेच शुभेच्छुक यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना आपल्या कार्यात आर्थिकदृष्ट्या सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करु शकतात.

आज अभियानाच्या माध्यमातून हजारो वंचित घटकांना पोट भर जेवण मिळते आहे,
त्यांना योग्य पोषण मिळत आहे.

धान्य घेतलेल्या अनेक संस्थांचे वेग वेगळे अनुभव आहेत –

१) काही संस्थांना पुरेशी मदत मिळत नव्हती त्यामुळे तेथे राहणाऱ्यांना योग्य ते पोषण मिळत नव्हते, आज त्यांना चांगल्या प्रति चे धान्य मिळते त्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारत आहेत, तेथील लोक कमी आजारी पडत आहेत.

२) ३–४ हजार किलो धान्य मिळाल्यावर संस्थेची ६ महिन्याची धान्याची गरज पूर्ण होते आणि या कालावधी मध्ये वाचलेल्या पैशातून संस्थांनी तेथील मुलांसाठी शाळेत जायला सायकल घेतल्यात, वाचनालय उभी केलीत, मुलांना नवीन कपडे आणि दप्तर घेतली.

३) संस्था अधिकाधिक वंचित घटकांपर्यंत पोहचते आहे, स्वतः ची क्षमता वाढवीत आहेत.
अभियानाच्या पारदर्शकते मुळे दिवसेंदिवस लोकांचा प्रचंड विश्वास संपादित होत आहे, आधी दान करताना दिलेले दान हे योग्य ठिकाणी जाईल कि नाही अशी काळजी वाटत होती ... आज या अभियानाच्या पारदर्शकते मुळे दानकर्त्यांना दान दिल्याचा आनंद होत आहे.

एक छोटीशी कल्पना आज सामाजिक चळवळीत मध्ये रुपांतरित झाली.

**– विनोद पाटील**
**अध्यक्ष, एक मुठ्ठी अनाज अभियान**

ठरल्याप्रमाणे संध्याकाळी ४ वाजता अभियान संपविले आणि दोन्ही सोसायटी मध्ये सभासदांनी भरभरुन प्रतिसाद दिला. गहू, तांदूळ आणि डाळ धान्य जमा झाले आमच्या उत्साहाला आणि आनंदाला पारावर उरला नव्हता. दोन्ही सोसायटी मधून साहित्य घेतले आणि संचालक मंडळाचे आभार मानले.

दुसऱ्या दिवशी महिला सेवा मंडळ जिथे १६० वंचित महिलांना सांभाळले जाते त्या संस्थेच्या संचालिका आल्या आणि धान्य स्वीकारले. २-३ दिवसात महिला सेवा मंडळ संस्थेकडून २८४ किलो धान्य मिळाल्याची पावती आली आणि अभियानाचा श्री गणेशा झाला.

पुढील २-३ महिन्यात सोसायटी ची संख्या २६ पर्यंत गेली, टीम हि वाढली आणि आमचा उत्साह ही.
ऑक्टोबर २०२१ मध्ये आम्ही अभियानाचा व्हिडीओ बनविला आणि तो प्रचंड व्हायरल झाला, बऱ्याच सोसायटी मधून फोन आले चौकशी झाली आणि त्यातूनच सोसायटी ची संख्या वाढायला सुरवात झाली.

ऑक्टोबर २०२१ मधेच आम्ही सेवावर्धिनीशी जोडले गेलो आणि अभियान सेवावर्धिनी मार्फत चालवले जावे असा निर्णय घेतला. दर महिन्याला सोसायटी ची संख्या वाढत होती, अभियान मूर्त स्वरुप घेत होते. अश्यातच नोव्हेंबर २०२२ मध्ये माननीय राज्यपाल श्री भगतसिंग कोश्यारी जी यांची भेट घेण्याचा योग आला. त्यांनी दिलेल्या शब्बासकीमुळे टीम चा उत्साह द्विगुणीत झाला.

आज ३४ महिने झालेत अभियान अविरत चालू आहे, मार्च २०२४ पर्यंत -

१. २ सोसायटी पासून सुरु झालेले अभियान आज ६८ सोसायटी पर्यंत पोहचले
२. ४ कार्यकर्त्यांनी सुरु केलेले अभियानात आज ६३० हुन जास्त कार्यकर्ते दर महिन्याला सहभागी होतात.
३. पुण्यातील ६ उपनगरात हे अभियान चालते
४. दर महिन्याला २६,००० घरापर्यंत संपर्क होतो
५. ७० हुन अधिक महिला या अभियानात दर महिन्याला आपला सहभाग देतात.
६. आज पर १,२०,००० किलो धान्य या अभियानाचे माध्यमातून जमा झाले आहे
७. अभियानाच्या माध्यमातून गेल्या ९९० दिवसापासून रोज ६०० जेवणाची व्यवस्था होते.
८. महाराष्ट्रातील ३८ संस्थांना धान्य स्वरूपात मदत झाली आहे.







# ४.० ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची
## एक मुठ्ठी अनाज अभियान - एक सामाजिक चळवळ

सामाजिक क्षेत्रात काम करताना असे अनुभव येतात ज्याने तुमच्या आयुष्याचा मार्गच बदलतो.

करोना महामारी आली आणि त्यात काम करताना अनेक बरे वाईट अनुभव आले. मनुष्य स्वभावाचे, बोलण्याचे वागण्याचे अनेक कंगोरे देखील समजले. सर्व समाज एकवटला तरच अशा आपत्तींवर मात करता येईल ही गोष्ट मनात रुजली. रुग्णसेवा, अनाथांची सेवा, रेशन किट वाटप, आपापल्या गावाला परतणाऱ्या कामगारांना मदत अशी अनेक कामे या काळात स्वयंसेवी संघटना करत होत्या.

या काळात १५-१६ अनाथ आश्रम ना आम्ही भेट दिली त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या, सर्वांची कॉमन गरज होती 'भूक". हे ही प्रकर्षाने जाणवले. या सर्व अनाथ मुला मुलींना निराधार वृद्धांना कायम स्वरूपी काय मदत करता येईल यावर विचार मंथन सुरु होते. सामाजिक क्षेत्रात मित्र मंडळी समवेत अनेक विषयांवर आम्ही चर्चा करीत होतो. यातूनच उदयास आले एक मुठ्ठी अनाज अभियान. ही संकल्पना जुनीच आणि खूप पूर्वी पासून चालत आलेली होती पण सध्याच्या तथाकथित मॉडर्न जगात हि संकल्पना प्रत्यक्षात कशी उतरवता येईल आणि सध्याची पिढी ज्यात नवरा बायको दोघे नोकरी ला आहेत ते दररोज एक मूठ धान्य जमा करतील का ?. हि शंकाच होती. पिंपळे सौदागर, विशाल नगर, वाकड या भागात सोसायटी भरपूर आहेत, छोट्या जागेत १००-२०० फ्लॅट आहेत. तोच एक प्लस पॉईंट घेऊन विचार आला कि रोज एक मूठ धान्य काढण्या ऐवजी सर्व फ्लॅट्स नि महिन्यातून एक मूठ धान्य दिले तरी प्रत्येक सोसायटी मध्ये ५०-६० किलो धान्य नक्कीच जमा होईल. धान्य घेताना गहू, तांदूळ, तूर डाळ, मूग डाळ घेण्याचे ठरले कारण हे धान्य जास्त टिकते.

२५ जुलै २०२१ ला ५ सोसायटी मध्ये पायलट प्रोजेक्ट करायचे नक्की केले. सोसायटी मध्ये भेटीगाठी सुरु केल्या. सोसायटीच्या संचालक मंडळाला भेटून उद्देश समजविण्याचा प्रयत्न करु लागलो. असे करत करत प्रत्यक्षात ठरलेल्या २५ तारखे पर्यंत फक्त २ सोसायट्या तयार झाल्या. पूर्वा रेसिडेन्सी आणि गणेश रेसिडेन्सी. तेही नसे थोडके म्हणत अभियानाला सुरवात केली.

बरेच प्रश्न होते, धान्य कशात घेणार, कोणत्या संस्थेला देणार, पॅकिंग कसे करणार इत्यादी इत्यादी.


त्यावर चर्चा करून अभियानाचे नियम ठरविले, त्यात -

- ज्या संस्थेला मदत करायची ही संस्था नोंदणीकृत असावी
- संस्थेला सरकार कडून कुठलीही मदत मिळत नसावी
- अभियान महिन्यातून एकदाच म्हणजे ३ऱ्या किंवा ४ थ्या रविवारी होणार, सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत
- गहू, तांदूळ, तूर डाळ, मूग डाळ, चा आग्रह असेल पण दानकर्ता जे देईल ती त्याची श्रद्धा म्हणून स्वीकारावं
- संस्थेकडून मिळालेल्या धान्याची पावती सर्व सोसायटी ना द्यायची म्हणजे पारदर्शकता ठेवता येईल.
- अभियानात फक्त धान्य घेतले जाईल, कुठल्याही स्वरूपाची आर्थिक मदत घेतली जाणार नाही.

धान्य जमा करण्यासाठी आम्ही त्यावेळी पुठ्ठ्याचे बॉक्स आणले आणि दोन्ही सोसायटी मध्ये ठेवले, सोसायटीच्या संचालक मंडळाला अभियानाची माहिती सोसायटी मध्ये प्रसारित करण्यास सांगितली. छोटे छोटे व्हिडीओ बनवले व ते सोसायटी ग्रुप मध्ये पाठवून वातावरण निर्मिती केली. दुपारी १२ - १२.३० पर्यंत आम्ही त्या बॉक्स सोबत बसून होतो, दान देणाऱ्यांना धन्यवाद देत होतो.

# ५.० सेवाव्रती

## ५.१ पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे



### वैद्यकीय क्षेत्रातील 'पथदर्शी' प्रयोग – विवेकानंद रुग्णालय, लातूर महाराष्ट्र

आजकाल करिअर बाबत अतिशय जागरूक आणि संवेदनशील पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये, वैद्यकीय क्षेत्र (डॉक्टरकी) हे अतिशय कौतुकाचे, सामाजिक प्रतिष्ठेचे आणि आर्थिक स्थैर्याचे साधन म्हणून लोकप्रिय आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये पूर्ण आवडीच्या विषयात विशेष प्राविण्याचे शिक्षण घेऊन मोठे रुग्णालय थाटणे, मोठ्या शहरांत किंवा संधी मिळता परदेशात काम करणे, अशा अनेक कल्पना आजचा तरुण वर्ग बहुतांशी रंगवत असतो. डॉक्टरांचे रुग्णांवर उपचार करणे ही सुद्धा एक प्रकारची सेवाच आहे असे आपण अनेकदा म्हणतो. त्यामुळे आपण नामांकित डॉक्टर झालो आणि भव्य अशा रुग्णालयात बसून रुग्णांवर उपचार करतो आणि त्यांना बरे करतो, इथेच कदाचित अनेकांची सामाजिक कार्याची व्याख्या येऊन थांबत असावी. परंतु यापलीकडे देखील वैद्यकीय क्षेत्रातून समाजोपयोगी काम करण्याच्या अनेक संधी, अनेक नवीन क्षितिजे आपल्यासमोर असतात. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे अशा वाटांवरून चालणारी अनेक अनुकरणीय उदाहरणे देखील आपल्या सभोवती असतात.

ही गोष्ट आहे, अशाच एका वैद्यकीय क्षेत्रात चाललेल्या संघटनात्मक विशेष उपक्रमाची, ज्याचे नाव आहे विवेकानंद रुग्णालय. समाजातल्या सर्व थरातील जास्तीत जास्त व्यक्तींना चांगल्या दर्जाचे उपचार वाजवी शुल्कात मिळावेत म्हणून १९६६ साली वैद्यकीय व्यवसायात संघटनात्मक कामाचा वेगळा प्रयोग करण्याच्या निश्चयाने चार ध्येयवेडे तरुण एकत्र आले – डॉ. अशोकराव कुकडे, डॉ .सौ ज्योत्स्ना कुकडे, डॉ. रेम अनुरकर व डॉ.गोपीकिशन भराडिया. या चौघांकडे स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध होत्या. त्यातून अमाप पैसा व प्रसिद्धी मिळवणे ही सहज शक्य होते. परंतु आपल्या शिक्षणाचा उपयोग मागास भागातील लोकांना व्हावा, त्यांना चांगल्या वैद्यकीय सुविधा मिळाव्या, या विचारांनी हे तरुण प्रेरित झालेले होते. अर्थातच अशा ठिकाणी वैद्यकीय सेवा देण्याची प्रेरणा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून मिळाली होती.

हे काम करायचं ते लोकांसाठीच करायचं ही भावना मनात दृढ होऊ लागते. आपण जे पेरतो ते कधी ना कधी उगवतं आणि चांगल्या कामाचे फळ चांगलेच मिळते हे आपण नेहमीच सांगत आलो, सांगत असतो. त्याचा प्रत्यक्ष अनुभव अशा संस्थांच्या कामांमध्ये येत असतो.

१९९० साली मुंबई पुणे आणि कोल्हापूर याच ठिकाणी सिटीस्कॅन होते. त्यावेळी विवेकानंद रुग्णालयामध्ये सिटीस्कॅन घेण्याचे ठरले पण पुरेसा निधी उपलब्ध नव्हता. पण एक विश्वास होता की सामाजिक कामासाठी आर्थिक अडचण केव्हाही येत नाही. समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी यासाठी सढळ हाताने मदत केली व सिटीस्कॅन उपलब्ध झाले. अशाप्रकारे ग्रामीण भागांमध्ये अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न विवेकानंद रुग्णालयाने यशस्वीरित्या केल्याचे दिसून येते. वैद्यकीय क्षेत्रात विवेकानंद रुग्णालयाने कमावलेली कीर्ती म्हणजे वैद्यकीय कौशल्य अधिक निस्वार्थ सेवाभाव, असे समीकरण आहे. संघाच्या एका गीतात म्हटल्याप्रमाणे 'स्वार्थ, लोभ आणि शत्रुत्वाचे दर्शन ठाई ठाई घडे'! अशा आपल्या समाजातील आजच्या वातावरणात 'निस्वार्थ, निरपेक्ष सेवा व कर्तव्य भावनेने' जर कोणी कार्य केले तर ते यशस्वी होऊ शकते हा विश्वास विवेकानंद रुग्णालयाच्या माध्यमातून येतो.

डॉ. अशोकराव कुकडे यांनी सुरू केलेल्या विवेकानंद रुग्णालयाच्या पाच दशकांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक आपत्ती अनुभवाला आल्या. आपली संस्था वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने काम करत असल्याने, समाजावरील कोणत्याही आपत्तीमध्ये स्वाभाविक रितीने काम करण्यास आपण उभे राहतो. १९९३ सालचा किल्लारीचा भूकंप, कच्छमधील भूकंप, तामिळनाडू मधील त्सुनामी, मुंबई, नेपाळ किंवा काश्मीरमधील महापूर अशा अनेक आपत्तीत विवेकानंद रुग्णालयाने यथाशक्ती निवारणासाठी हातभार लावलेला होता. हेच त्यांच्या सामाजिक कर्तव्य भावनेचे दृश्य स्वरूप होते. वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने काम करणाऱ्या संस्थेचे हे आदर्श आपल्या डोळ्यासमोर असावेत. 'कोरोना काळातही याचा पुन: हार्दिक अनुभव आला!

डॉ. अशोकराव कुकडे यांनी केलेल्या अतुलनीय आरोग्य विषयक सेवा कार्याची दखल घेऊनच भारत सरकारने त्यांची "पद्मभूषण" पुरस्कारासाठी निवड केली. या कार्याला समाजमान्यते बरोबरच शासनमान्यताही मिळाली आहे, असे म्हणता येईल व त्यायोगे आपल्यालाही अशा कामाची प्रेरणा मिळावी यासाठी हा लेख प्रपंच.

— विनोद खरे

रुग्णालय सुरु करण्यासाठी आपल्याला कोणकोणत्या डॉक्टरांची आवश्यकता आहे याचा विचार करून हेतुपूर्वक तशाच प्रकारचं शिक्षण घेण्यातआले. उदाहरणार्थ, डॉ. अशोकराव कुकडे हे MBBS ला विद्यापीठात सर्वप्रथम आले होते. त्यांचे आवडीचे विषय मेडिसिन किंवा ऑर्थोपेडिक असे असूनही नवीन रुग्णालयाची गरज लक्षात घेता त्यांनी आपल्या आवडीचे विषय सोडून पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी जनरल सर्जरी हा विषय घेऊन अभ्यासक्रम सुवर्णपदकासह पूर्ण केला. त्याचप्रमाणे डॉ. ज्योत्स्ना कुकडे यांनी पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी मेडिसिन या विषयाची निवड केली होती, परंतु ग्रामीण भागात रुग्णालय सुरु करायचे असेल तर स्त्रीरोग तज्ञाची नितांत आवश्यकता आहे म्हणून त्यांनी आपल्या आवडीचा मेडिसिन विषय डावलून स्त्रीरोग तज्ञ या विषयासाठी पुढील अभ्यासक्रम निवडला.

या सर्व विचार व धडपडीतून लातूर सारख्या उपेक्षित व दुष्काळी भागाची निवड करण्यात आली. जानेवारी १९६६ साली. विवेकानंद रुग्णालयाची भाड्याच्या बारा खोल्यांमध्ये सुरुवात झाली. तीन खोल्यांमध्ये दोन डॉक्टर कुटुंब व बाकीच्या नऊ खोल्यांमध्ये रुग्णालय सुरु करण्यात आले. जवळजवळ एक वर्षामध्ये बचतीपैकी काटकसर करून, पैसा जमवून स्वतःची जागा घेऊन त्या ठिकाणी रुग्णालय बांधण्याचा संकल्प करण्यात आला. रुग्णालयाच्या खात्यामध्ये जमा झालेली रक्कम, काही दानशूर व्यक्तींकडून ठेवी घेऊन व बँकेचे कर्ज – असे मिळून दहा हजार चौरस फूट जागा विकत घेऊन बांधकाम सुरु करण्यात आले. १९ ऑगस्ट १९६९ ला विधिवत विवेकानंद रुग्णालयाची स्वतःच्या वास्तूमध्ये सुरुवात झाली. १९७५ पर्यंत विवेकानंद रुग्णालय हे प्रथितयश व सर्व सुविधांनी युक्त असे सामान्य नागरिकाला परवडेल असे उत्तम रुग्णालय म्हणून समाजात मान्यता प्राप्त झाले होते.


२६ जून १९७५ रोजी देशभरामध्ये आणीबाणीच्या काळात देशभरातील संघ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली यात डॉ. अशोक कुकडे देखील होते. जवळजवळ 21 महिने ते जेलमध्ये असताना, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये सुद्धा विवेकानंद रुग्णालयाचे काम थांबले नव्हते. १९७७ मध्ये आणीबाणी उठल्यानंतर त्यांनी पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली. अनेक अडचणींवर मात करत रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर जात होते आणि याला समाज मान्यता सुद्धा मिळत होती.

१९६६ ते ७९ या काळामध्ये विवेकानंद रुग्णालय हे खूप मोठ्या प्रमाणामध्ये सर्व सुविधांनी युक्त अशा प्रकारचे भागीदारी पद्धतीचे मोठे रुग्णालय म्हणून नावारूपाला आले. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करून स्वतःच्या कर्तृत्वाने ती समाजाला अर्पण करण्याचं धाडस या मंडळींनी केलं व १ जानेवारी १९८० रोजी या संस्थेचे "विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर" या नावाने विश्वस्त संस्थेत रुपांतर केले. ही सगळी संस्था समाजाला अर्पण करून त्यामध्ये आपण सामील झाले. अशा प्रकारे स्वकष्टाने मिळवलेली संपत्ती, समाजाला अर्पण करणे हा एक उदात्त भाव या सगळ्या कामातून आपणास पाहायला मिळतो.

समाजातील वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे अन्य डॉक्टर मंडळी नेहमी प्रश्न विचारतात – आम्ही सुद्धा त्याच क्षेत्रात काम करतो, तुम्ही सुद्धा रुग्णांवर उपचार करता त्याची फी घेता, आमच्यासारखं तुमचही त्याच फी वर घर चालत, मग तुम्ही करता ते सेवाकार्य आणि आम्ही करतो तो धंदा किंवा प्रॅक्टिस असं का म्हटलं जातं? तुमच्या आमच्यात नक्की काय फरक आहे? सगळ्यात महत्वाचे म्हणजे सर्व मालकी हक्क सोडले व सर्व अर्जित असलेले समाजाच्या मालकीचे झाले, व्यक्तीगत राहिले नाही!

विवेकानंद रुग्णालयाचे विश्वस्त संस्थेमध्ये रुपांतर केले तेव्हा सेवा कार्य व अन्य प्रॅक्टिस यातील हा फरक स्पष्ट झाला. कोणा एकाच्या किंवा एखाद्या गटाच्या हितसंबंधासाठी किंवा त्याच्या उपजीविकेसाठी कोणतीही संस्था चालवायची नसते, तर संस्थात्मक कामामागे व्यापक सामाजिक संदर्भ असतात, उदात्त हेतू असतात, समाजाला उपयुक्त ठरतील असे उपक्रम राबवावे लागतात. यातून समाज आपल्याकडे कसा पाहतो हेही जाणवायला लागते.

# ५.२ पद्मश्री डॉ. मनोहर कृष्णा डोळे – संदीप डोळे



## समाजसेवेच्या ध्यासातून नेत्ररुग्णालय

डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनचे मोहन दुसे नेत्र रुग्णालय, नारायणगांव, जि. पुणे ही गेली ४२ वर्षे पुणे, नगर, सातारा, नाशिक व ठाणे इ. जिल्ह्यातील दहा तालुक्यांमध्ये नेत्र विषयक काम करीत आहे. या रुग्णालयातून आजपर्यंत एक लाख पंच्याहत्तर हजारहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. या संस्थेमार्फत प्रत्येक महिन्याला ४०-६६ मोफत नेत्रतपासणी शिबिरे घेऊन या शिबिरांद्वारे नेत्र रोगांवरील रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येतात. येथील नेत्र रुग्णालय आदिवासी, वनवासी व ग्रामीण भागासाठी वरदान ठरलेले आहे.

डॉ. मनोहर डोळे यांनी २६ डिसेंबर १९८२ रोजी नारायणगांव येथील मोहन दुसे यांच्या जुन्या छोट्या जागेत मोहन दुसे नेत्र रुग्णालय सुरु केले. या जागेत तात्पुरते ऑपरेशन थिएटर उभारले. त्याला लागणारी सर्व यंत्रणा येथेच जमा केली. पुण्याहून नेत्रतज्ञ डॉ. सुधीर काळे, डॉ. रविंद्र कोलते असे तज्ञ डॉक्टर या भागातील रुग्णांना सेवा देण्यासाठी येऊन विनामूल्य सेवा देत असे. ८ वर्षे अशाच प्रकारे काम करून सन १९९०-९१ मध्ये १० हजार चौ. फुट जागेत या छोट्याशा रुग्णालयाचे मोठ्या रुग्णालयात रुपांतर झाले. या रुग्णालयाची कामाची दखल घेऊन जागतिक बँकेने भारत सरकारच्या माध्यमातून १४ लाख रु ची देणगी या रुग्णालयाला दिली. अनेक दानशूर देणगीदार व संस्थांच्या मदतीने आज हे रुग्णालय अद्ययावत सुविधांनी युक्त झाले आहे. रुग्णालयामध्ये चाळीस कॉटसची सुसज्ज अशी रु. ६० लाखाची दुमजली भव्य इमारत, २४ तास दहा निवासी तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती, तीन अति आधुनिक वातानुकूलित शस्त्रक्रियागृह असून या ठिकाणी एकाच दिवसात कमीतकमी ६० शस्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध आहे. संस्थेच्या वतीने आदिवासी व ग्रामीण भागातील रुग्णांना नेत्र सेवा मिळावी यासाठी सुमारे ८० ते १०० किमी परिसरातील बेल्हा, पारनेर, आळकुटी, टाकळी ढोकेश्वर, निघोज, जुन्नर, पारगाव या गावांमध्ये उपकेंद्रे सुरु केली आहेत. रुग्णांना ने आण करण्यासाठी पाच रुग्णवाहिका सुसज्ज ठेवण्यात आलेल्या आहेत. शिबिरांच्या माध्यमातून आलेल्या रुग्णांची लेन्स टाकून शस्त्रक्रिया केली जाते. तसेच त्यांना मोफत प्रवास, जेवण, चहा, निवास आदी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मधुमेही रुग्णांसाठी मागील पडद्याची (रेटिना) तपासणी सुविधा येथे उपलब्ध आहे. संस्थेच्या माध्यमातून भविष्यात नेत्रपेढी, डोळ्यांचा फिरता दवाखाना, ऑप्टोमेट्रिस्ट डिप्लोमा कोर्स संशोधन प्रकल्प सुरु करण्याचा मानस आहे.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन – कार्यवाह

श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर – प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर – प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी



श्री नवलमल फिरोदिया ट्रस्ट, पुणे यांच्याकडून डोळ्यांचा अत्याधुनिक फिरता दवाखाना (मोबाईल आय क्लिनिक) नेत्र रुग्णालयासाठी देताना मा. श्री अभय फिरोदिया



नेत्र तपासणी करताना डॉ. मनोहर डोळे

१) मोहन ठुसे नेत्र रुग्णालय व संशोधन संस्था :- महिन्यात सुमारे ४० मोफत नेत्र तपासणी शिबिरे डोंगराळ भागासह सर्व परिसरात घेऊन नेत्ररुग्ण गोळा केले जातात. त्यांचे चांगल्या प्रकारची लेन्स टाकून ऑपरेशन करून दोन दिवस चहा, भोजन दिले जाते व पुन्हा त्यांना आपल्या निवासस्थानी सोडले जाते.

२) अथर्व नेत्रालय व हायटेक लेसर सेंटर: लेसरच्या सहाय्याने उपचार करणारे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एकमेव हॉस्पिटल आहे. डोळ्याच्या आजारांकरीता थोडाफार खर्च करू शकतील अशा रुग्णांवर येथे उपचार केले जातात.

३) माधव नेत्रपेढी:-अंध नेत्ररुग्णांसाठी 'माधव नेत्र पेढी' द्वारे 'कॉर्निअल इम्प्लॅन्ट' (केरॅटोप्लॅस्टी) च्या सहाय्याने नवीन दृष्टी दिली जाते.

४) श्री. विनायक श्रीपाद राजगुरु डोळ्यांचा अत्याधुनिक फिरता दवाखाना (मोबाईल आय क्लिनिक): एकूण सहा ॲम्ब्युलन्स द्वारे अत्यंत दुर्गम भागातील नेत्ररुग्णांच्या घरापर्यंत नेत्रसेवा देण्याचा प्रयत्न केला जातो.

५) रक्त साठवणूक केंद्र:- संपूर्ण जुन्नर तालुक्यात २४ तास रक्त पुरवठा करणारे हे एकमेव रक्त साठवणूक केंद्र असून महिन्याला सुमारे १५० रक्त पिशव्या अत्यावश्यक रुग्णांना दिल्या जातात.

६) फेको ट्रेनिंग सेंटर:- रुग्णालयाच्या फेको इमल्सिफिकेशन सेंटरमध्ये भारताबाहेरील देशामधूनही नेत्रतज्ञ ट्रेनिंगसाठी येतात.

७) मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रशिक्षण केंद्र: कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ञ डॉक्टरांकडून पडदा खराब झाल्याने दृष्टी गेलेल्या रुग्णांसाठी मुक पेशींचा मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण दिले जाते.

८) स्टेम सेल संशोधन केंद्र, पुणे: डोळ्याचा वापर करून पुन्हा दृष्टी प्राप्त करून देण्याचे संशोधन व काम केले जाते. आजपर्यंत संस्थेने सुमारे एक लाख पंच्याहत्तर हजार मोफत मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.

डॉ. मनोहर डोळे यांनी आरोग्य आणि शिक्षण यांची सांगड घालत नेत्रदानाचे हे कार्य करण्यामध्ये यथाशक्ती आपला वाटा उचलला आहे. आजच्या तरुण पिढीने त्यांना आदर्श मानून काम केल्यास शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही म्हणूनच म्हणावेसे वाटते......

नेत्र ज्योतीने उजळे जीवन । नवल पाहतील सृष्टीचे........।<br>
मदतीचे का होई मापन । दान देवू या दृष्टीचे.....॥

**- डॉ. संदीप मनोहर डोळे**

## Eligibility Criteria and Procedure -

1. Your organization should be registered as a non-profit organization or charity organization, not as
    a. a government entity or organization.
    b. a hospital or healthcare organization
    c. a school, academic institution of university
2. You should have a soft copy of the registration.
3. Your organization should have its registered domain
4. Check the country wise eligibility before you proceed

## Procedure -

1. Search Google for non-profits on the internet.
2. Keep a soft copy of your government registration.
3. Note down your domain name.
4. Please keep the password handy if you already have the email of your domain.
5. Look for the registration link, then it will ask for your current domain name. Then it will ask you to upload a registration certificate. Post that login with your current admin login to the domain.
6. This will take a week to get you confirmation from Google.
7. Once it is confirmed then login with admin. It will take you to Google Workspace. You will see Gmail and other Google products.
8. Go to Email and check all your previous email IDs are migrated here.

- Vinod Thakur

# ૬.૦ સેવાવાર્તા – સંસ્થાંસાઠી મહત્વાચે

## Google for Non-Profit Organizations

Google for Nonprofits is a free program that offers Google Products/tools to eligible nonprofit organizations. This can help to solve the challenges that Nonprofits face: finding new donors and volunteers, working more efficiently, and getting supporters to take action. Google for Nonprofits is currently available in 65+ countries.

Some of the advantages of Google for Nonprofits include

1. YouTube Nonprofit Program: This program allows nonprofits to engage with supporters through videos
2. Google Workspace includes, Gmail, Drive, Meet, Calendar, Chat, Slides, Sheets, Docs, Keep, Sites, Forms, Currents
3. Gmail offers unlimited Gmail accounts with @yourdomain.com
   Each user will get 30 GB of cloud storage.
4. Google Meet with100 participant video meetings
5. Technical Issues resolution: This program offers quick resolution of technical issues with 24/7 support via phone, chat, and email
6. Google Ad Grants – This helps your organization to attract donors, raise awareness about your activities, get more volunteers
7. Google Maps Platform – This helps people locate community/volunteering programs and resources around them
8. Check to see which Google for Nonprofits products are available in your country

## Benefits -

1. Stay in touch with volunteers, donors, supporters, and your community with unlimited email addresses at your custom domain via Gmail.
2. Keep everyone on the same page with Google Docs – create and edit grant proposals, meeting agend s, and more, in real-time, from anywhere.
3. Keep schedules organized and appointments updated with Google Calendar.
4. Enable your teams to collaborate, iterate, and innovate together, from anywhere, in real-time, with our cloud-based productivity suite.

आदिवासी भागात या रुग्णालयाच्या माध्यमातून जी विशेष शिबिरे घेतली जातात, त्यात ६० टक्के रुग्णांचा या शिबिराचा लाभ मिळाला आहे. रुग्णालयाच्या वतीने नेत्रपटल प्रत्यारोपणाचे कार्य सुरु केल्यानंतर मृत्यूनंतर नेत्रदान करणाऱ्या १०० हून अधिक लोकांचे नेत्रपटल काढून अंध असलेल्या व्यक्तींना नेत्ररोपण करुन या अंध व्यक्तींना दृष्टी देण्याचे काम मोहन कुसे नेत्र रुग्णालयाने केले आहे. संस्थेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या डोळे फाउंडेशन रक्तपेढीला देखील उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून पारनेर ते संगमनेर पर्यंत ही एकमेव रक्तपेढी आहे. या रक्तपेढीतून दर महिन्याला किमान २००–२५० रुग्णांना रक्तपुरवठा केला जातो. रक्तपुरवठ्याची मागणी लक्षात घेऊन जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे यासाठी नेत्रशिबिरांबरोबर रक्तदान शिबिराचे आयोजन देखील संस्थेच्या माध्यमातून करण्यात येते. संस्थेच्या माध्यमातून डॉ. मनोहर डोळे यांनी गेली ४० वर्षे राबविलेल्या सामाजिक उपक्रमाची व कार्याची दखल घेत या रुग्णालयाला आतापर्यंत २० हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत. विशेष म्हणजे गेल्या वर्षी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डॉ. मनोहर डोळे यांच्या कार्याबद्दल त्यांना 'डि.लिट' ही पदवी देऊन सन्मानित केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या मानाचा समजला जाणारा 'शिवनेरी भूषण' हा पुरस्कार मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते किल्ले शिवनेरी येथे देण्यात आला.

या रुग्णालयामध्ये कॉम्प्युटरद्वारा नेत्र तपासणी, आंतरराष्ट्रीय दर्जाची "व्हाईट स्टार" तंत्रज्ञान असलेले लेसर मशीनद्वारे (फेको इमल्सिफिकेशन) बिनटाक्याची, बिनाभूल, बिनापट्टीची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याची ग्रामीण भागातील एकमेव अद्ययावत सुविधा असलेले रुग्णालय आहे. विशेष म्हणजे या रुग्णालयामध्ये शस्त्रक्रियेनंतर रुग्ण एक तासाच्या आत घरी जाऊ शकतो, डोळ्यांच्या पडद्यावरील तपासणी व शस्त्रक्रिया (ग्रीन लेझर द्वारे उपचार), लहान मुलांची नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया, काचबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया, डोळ्यांच्या पापणीवरील शस्त्रक्रिया (प्लॅस्टिक सर्जरी), एन–डी याग लेसरद्वारे उपचार, तिरळेपणावरील तपासणी व शस्त्रक्रिया, नासूरवरील दुर्बिणीद्वारा शस्त्रक्रिया, नेत्रदानानंतर नेत्रपटल काढून दुसऱ्या व्यक्तीला डोळा (नेत्रपटल) बसविण्याची नेत्ररोपण शस्त्रक्रिया. मधुमेही रुग्णांसाठी विशेष नेत्र तपासणी, मधुमेही रुग्णांसाठी डोळ्यांच्या मागील पडद्याची तपासणी व ग्रीन लेझर द्वारा उपचार इ. सुविधा उपलब्ध आहेत या सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणारे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील हे डोळ्यांचे एकमेव हॉस्पिटल आहे.

लॅसिक म्हणजे लेझर इन सिटू केराटोमिलीयसीस, तुमची दृष्टी सुधारण्यासाठी केली जाणारी ही एक सुप्रसिध्द आणि सर्वमान्य लेझर अपवर्तन (रिफ्रॅक्टिव) प्रक्रिया आहे. कॉन्टॅक्ट लेन्सेस किंवा चष्मा वापरणे यासाठी एक चांगला पर्याय म्हणून याची नेहमी शिफारस केली जाते. डोळ्याच्या पुढील भागात असलेल्या टिश्यूला जो कॉर्निया म्हणून ओळखला जातो, आकार देण्यासाठी एका खास प्रकारच्या कटिंग लेसरचा उपयोग केला जातो. त्याने दृष्टी सुधारते आणि दुरचे न दिसणे व जवळचे न दिसणे किंवा जवळचे व लांबचे अंधुक दिसणे यासारख्या समस्यांकरीता लाभदायक आहे. भारतातील ग्रामपंचायत स्तरावरील लॅसिक लेसर उपचार सुविधा असणारे हे एकमेव हॉस्पिटल असा सर्वोच्च मान हॉस्पिटलला मिळत आहे. या निमित्ताने कार्लझाईस, जर्मनी (MEL 90) या अत्याधुनिक मशिनद्वारे डोळ्याचा चष्म्याचा नंबर कायमचा घालविण्याची शस्त्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. अत्यंत कमी वेळाची व सुरक्षित अशी ही शस्त्रक्रिया असून रुग्णांना एका तासामध्ये घरी सोडण्यात येते.

संस्थेच्या विश्वस्त व संचालकांनी संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये डॉ. मनोहर डोळे मेडिकल फौंडेशन स्थापन करून त्याअंतर्गत खालील सर्व संस्थांचा समावेश केला आहे.